## MAHARASHTRA ACT No. XIII OF 1991.

## THE CITY OF NAGPUR CORPORATION (RE-ENACTMENT OF OCTROI RULES WITH RETROSPECTIVE EFFECT AND VALIDATING PROVISIONS) ACT, 1991.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक २७ मार्च १९९१ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

डी. एन. चौधरी,
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XIII OF 1991.

## AN ACT TO RE-ENACT RULES WITH RETROSPECTIVE EFFECT FOR SPECIFYING MAXIMUM AMOUNT OF TAX AS PROVIDED IN SUB-SECTION (*3*) OF SECTION 114 OF THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND TO MAKE CERTAIN VALIDATING PROVISIONS.

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक २७ मार्च १९९१ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

## सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३.

**नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ याचे कलम ११४, पोट-कलम (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, कराची कमाल रक्कम विनिर्दिष्ट करण्यासाठी भूतलक्षी प्रभावाने नियम पुनरधिनियमित करण्याकरिता आणि विवक्षित विधिग्राह्यकारी तरतुदी करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

१९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २. **आणि ज्याअर्थी,** नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ याचे कलम ११४, पोट-कलम (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, कराची कमाल रक्कम विनिर्दिष्ट करण्यासाठी भूतलक्षी प्रभावाने नियम पुनरधिनियमित करण्याकरिता आणि नागपूर शहरात विक्रीसाठी, खपासाठी किंवा वापरासाठी आणलेल्या जनावरांवरील किंवा मालावरील उपकर विधिग्राह्य करण्यासाठी, विवक्षित विधिग्राह्यकारी तरतुदी करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक झाले होते अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री झाली होती आणि म्हणून त्यांनी १६ फेब्रुवारी १९९१ रोजी नागपूर शहर महानगरपालिका (भूतलक्षी प्रभावाने जकात नियम पुनरधिनियमित करणे व विधिग्राह्यकारी तरतुदी) अध्यादेश, १९९१ प्रख्यापित केला होता; १९९१ चा महा. अध्या. ४.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे;

त्याअर्थी आता, भारतीय गणराज्याच्या बेचाळिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास नागपूर शहर महानगरपालिका (भूतलक्षी प्रभावाने जकात नियम पुनरधिनियमित करणे व विधिग्राह्यकारी तरतुदी) अधिनियम, १९९१ असे म्हणता येईल.

(२) दिनांक १६ फेब्रुवारी १९९१ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

जनावरे व माल यांवरील उपकराचा कमाल दर विहित करणारे नियम पुनरधिनियमित करणे.

१९२२ चा मध्यप्रांत व वऱ्हाडचा २.

२. मध्यप्रांत व वऱ्हाड नगरपालिका अधिनियम, १९२२ (यात यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम," असा करण्यात आला आहे) याचे कलम ६६, पोट-कलम (२) अन्वये आणि मध्य प्रांत व वऱ्हाड शासकीय अधिसूचना क्रमांक २०९३-७१४-आठ, दिनांक ५ सप्टेंबर १९२३ अन्वये करण्यात आलेले, जकातीच्या व हैसियत कराच्या दराची कमाल रक्कम विहित करणारे नियम, आणि मध्यप्रदेश शासनाने, शासकीय अधिसूचना क्र. १५८४/१६६१-एम-तेरा, दिनांक २९ एप्रिल १९५० अन्वये, उक्त अधिनियमाखाली त्याचप्रमाणे केलेले आणि नगरपालिका समित्या व अधिसूचित क्षेत्र समित्या यांच्याकडून लादण्यात येणाऱ्या जकात कराच्या कमाल रकमेसंबंधीचे नियम हे, १५ डिसेंबर १९६० रोजी अंमलात असल्याप्रमाणे, ते जेथवर, नागपूर शहर महानगरपालिका क्षेत्रात आणलेल्या जनावरांच्या व मालाच्या बाबतीत देय असलेल्या उपकराचा किंवा जकातीचा कमाल दर विहित करण्यासंबंधातील असतील तेथवर, राज्य शासनाकडून १५ डिसेंबर १९९० रोजी पुढीलप्रमाणे रीतसर व विधिग्राह्य रीतीने पुनरधिनियमित करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :—

"१. नाव व प्रारंभ.—(१) या नियमांना, नागपूर शहर महानगरपालिका जकात (कमाल दर विहित करणे) नियम, १९९१ असे म्हणता येईल.

(२) हे नियम, दिनांक १५ डिसेंबर १९६० रोजी अंमलात आले असल्याचे मानण्यात येईल.

१९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २.

२. व्याख्या.—या नियमांमध्ये, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,

(अ) "अधिनियम" म्हणजे, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८;

(ब) "माल" म्हणजे, अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेला माल व त्यात त्या अनुसूचीत नमूद केलेल्या जनावरांचाही समावेश होतो;

(क) "अनुसूची" म्हणजे, या नियमांची अनुसूची.

जकात बसविणे व त्यासाठी कमाल दर.

३. (१) या अधिनियमाचे उपबंध व त्याखाली केलेले नियम यांना अधीन राहून त्याखाली केलेली उपकराची (जकातीची) आकारणी, वसुली व परतावा यांचा संबंध असेल तेथवर, अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या अनेक मालांच्या बाबतीत, महामंडळाकडून जकात बसवली जाईल.

(२) अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही मालावर महामंडळ ज्या दराने जकात बसवील तो दर, त्या अनुसूचीतील स्तंभ (३) मध्ये त्या मालासाठी विनिर्दिष्ट केलेल्या कमाल दराहून अधिक नसेल.

## अनुसूची

(नियम ३ पहा)

नागपूर शहर महानगरपालिकेच्या जकात हद्दीत जकातीस पात्र असलेल्या मालाची अनुसूची

| बाब क्रमांक | वस्तूचे नाव | जकात दर | |
|---|---|---|---|
| | | यथामूल्य दराची टक्केवारी | दर क्विंटलचा दर किंवा संबंधित बाबीसमोर विनिर्दिष्ट केल्या-प्रमाणे दर |
| (१) | (२) | (३) | |
| | | रु. पैसे | रु. पैसे |
| १ | गवत, गवताच्या काड्या, भुसा, तणस (पेरा), कोंड, भाताच्या तुसाची भुकटी, कडबा, हिरवा चारा, कडब्याचा चुरा धरून. | ... | ०.६० |

अनुसूची—चालू

| (१) | (२) | (३) | |
|---|---|---|---|
| | | रु. पैसे | रु. पैसे |
| २ | कापसाचे बी (सरकी), चुनी, महुआ, सर्व प्रकारच्या पेंडी, सोयाबीन तेलाची भुकटी, कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात येणारे धान्याचे खांड धरून. | ... | ०.८० |
| ३ | सर्व प्रकारची धान्यें व डाळी, पोहे, धान्याचे पीठ-बेसन, मैदा, सोजी धरून आणि भाजके धान्य, लाह्या व मुरमुरा, राजगिरा, राजमा, कुटकी, कोडो, सावा व बाजरी. | ... | १.५० |
| ४ | सर्व प्रकारच्या तेलबिया, भुईमूग, टरफलासहित किंवा टरफलाविना, अंबाडीच्या बिया, राई, सरसू, जगनी, टोळी (महुआ बिया), निंबईच्या बिया, सूर्यमुखीच्या बिया, रेप बिया, करडईच्या बिया, सोयाबिनच्या बिया यांसह. | ... | २.०० |
| ५ | सर्व प्रकारचे खाद्य तेल उदा. तिळाचे, जवसाचे तेल, भुईमुगाचे तेल, राईचे तेल, अपरिष्कृत एरंडेल, खोबरेल तेल, टोळी तेल, सोयाबीन तेल, करडई तेल, सरकीचे तेल, पामतेल व पामोलिन, रेप बियांचे तेल, सूर्यमुखीच्या बियांचे तेल, परिष्कृत खाद्यतेल (बाटल्यात न भरलेले व हायड्रोजनयुक्त नसलेले). | ... | ८.०० |
| ६ | वनस्पति-तूप, हायड्रोजनित तेल व तुपाऐवजी वापरले जाणारे परंतु शुद्ध तूप नसलेले अन्य तूपवर्गीय पदार्थ, मार्गारिन. | ६.०० | .... |
| ७ | शुद्ध तूप, लोणी, खवा व मध .. .. | ... | २०.०० |
| ८ | सर्व प्रकारच्या भाज्या, उदा. बटाटे, रताळी, सुके व पातीचे कांदे, हरभरा, तुरीच्या शेंगा, पापडीच्या शेंगा, मटार, परवर, कुंडरु, कोथिंबीर, हिरव्या मिरच्या, ओले शिंगाडे, टोमॅटो, वांगी आणि हिरवा वाटाणा. | ... | १.२५ |
| ९ | ओले आले, सुक्या मिरच्या, चिंच, सुका लसूण .. | ... | ५.०० |
| १० | संत्री, मोसंबी, नारिंगी, ऊस, सफरचंद, द्राक्षे, डाळिंब, अननस, लिची, पीच, पेअर, नास्पती, बेदाणा, चिकू, अलूचा, रास्पबेरी इ. आणि अन्यत्र विनिर्दिष्ट न केलेली सर्व प्रकारची ताजी फळे. | ... | २.०० |
| ११ | नारळ, वाळलेले शिंगाडे, हळकुंड, आंबोशी (खटाई), धणे, आणि संस्करित पशुखाद्य, कोंबडयांचे खाद्य व माश्यांचे खाद्य. | ... | ५.०० |
| १२ | (अ) खारीक, पिस्ता, बदाम, मनुका, खिसमिस, अक्रोड, अलुबुखार, अंजीर, चिरोंजी (चारोळी), जर्दाळू, काजू, चिलगूज, सक्करपारा, माखन, खोबानी, आंब्याची भुकटी, गोडांबी, गोंद (डिंक) आणि इतर सर्व प्रकारचा सुकामेवा. | १०.०० | .... |
| | (ब) खोबरे, खोबऱ्याचा किस व तुकडे .. | ४.०० | .... |
| १३ | साखर व खडीसाखर .. .. | ५.०० | .... |
| १४ | गूळ, राब, पेंडखजूर, शिरा व काकवी .. | ४.०० | .... |

अनुसूची—चालू

| (१) | (२) | (३) | |
|---|---|---|---|
| | | रु. पैसे | रु. पैसे |
| १५ | चहा, कॉफी, कोको व कोकोजेम .. | ५.०० | .... |
| १६ | (अ) निरनिराळी सुगंधी तेले, डबाबंद किराणामाल, बाटलीत भरलेला व पुडकी बांधलेला सर्व प्रकारचा किराणा माल, मटण, डुकराचे मास व मासळी (खाटीकाकडचे ताजे मास व मासळी सोडून), मसाले (दळलेले किंवा न दळलेले), डबाबंद तंबाखू, तपकीर व सर्व प्रकारचा पानमसाला, किमाम, सॅकरीन, पाश्चरीकृत लोणी व लोण्याऐवजी वापरावयाचे पदार्थ, सर्व प्रकारची भारतीय मिठाई, पाव, पापड, बारीसू, लोणचे, चिवडा, चटणी, सर्व प्रकारचे केकवर्गीय पदार्थ, कोकाकोल्याचा अर्क (फँटा), चहा-कॉफी वर्गीय पेये इत्यादी, पेपरमिंट, पेस्ट्री, सर्व प्रकारचा शिरका, सर्व प्रकारचे ग्लुकोज, चॉकोलेट, बिस्किटे, बार्ली, दुधाची भुकटी, आणि दुधाचे पदार्थ, फळांचा रस आणि औषधियुक्त नसलेला सिरप (सरबत), सर्व प्रकारची कर्बयुक्त पेये, उदा. लिमका, कॅम्पाकोला ७७, सोडा आणि सर्व प्रकारची शीतपेये. | ६.०० | ... |
| | (ब) गुलकंद, मुरंबा, सर्व प्रकारच्या फळांचा मुरंबा, मिरचीची भुकटी, हळद, जिऱ्याची भुकटी, मेथीची भुकटी, आणि अन्यत्र नमूद न केलेले इतर प्रकारचे मसाले, चीज, जॅम व जेली. | ४.०० | .... |
| १७ | सर्व प्रकारची मासळी (जिवंत किंवा मृत व डबाबंद नसलेली), अंडी व मांस. | ... | १०.०० |
| १८ | जंगली श्वापदे, सर्व प्रकारच्या शिकारी (मृत व जिवंत) | ... | १.०० प्रत्येकी. |
| १९ | कोंबड्या, बदके, पोपट व इतर पक्षी आणि अन्यत्र विनिर्दिष्ट न केलेल्या पक्ष्यांची पारध. | ... | ०.२० प्रत्येकी. |
| २० | मेंढ्या, शेळ्या, कोकरू, बछडे व डुकरे .. .. | ... | १.०० प्रत्येकी. |
| २१ | बैल, गोऱ्हा, म्हैस व रेडकू, घोडे, गाई व गोऱ्ही .. | ... | २.०० प्रत्येकी. |
| २२ | भाजीपाला बियाणे, वैरणाचे बियाणे, फळाचे बियाणे, फुलाचे बियाणे, झाडाचे बियाणे, भांगाचे बियाणे (बोरू, आंबाडीचे बियाणे आणि टरोटाचे बियाणे वगळून), चिचोके, खसखस. | ... | १०.०० |
| २३ | नागवेलीची पाने .. .. | ... | १०.०० |
| २४ | (अ) सर्व प्रकारच्या सुपाऱ्या .. .. | ... | १५.०० |
| | (ब) वेलची, जायपत्री, जायफळ, एलचाचे बियाणे, कापूर, कलमी, मिरा, साबूदाणा, मेथीचे बियाणे, कोकमाचे फूल, लेमन ज्यूस पावडर (लिंबूसत) आणि (तळटीप क्रमांक १ प्रमाणे) अन्यत्र विनिर्दिष्ट न केलेल्या किराणामालातील अन्य वस्तू. | ६.०० | .... |
| | (क) लवंग .. .. .. | ६.०० | .... |
| | (ड) काथ .. .. . | ६.०० | .... |

अनुसूची—चालू

| (१) | (२) | (३) | |
|---|---|---|---|
| | | रु. पैसे | रु. पैसे |
| २५ | पेट्रोलियम पदार्थ, जसे—सॅवासॉल ऑईल, डिझेल ऑईल, क्रूड ऑईल, मावा ऑईल, व्हाईट ऑईल, मशिनरी ऑईल, शुद्ध एरंडेल तेल, सर्व प्रकारची वंगणाची तेले, स्पोरिडल ऑईल, चातीचे तेल (स्पिंडल ऑईल), फर्नेस ऑईल, ग्रीझ, पेट्रोलियम जेली, मेण, स्वयंपाकाचा गॅस (एल.पी.), सर्व प्रकारची खनिज तेले, पेट्रोल व विमानाचे पेट्रोल (आय.सी.ए.) आणि अन्यत्र तरतूद न केलेली अन्य प्रकारची तेले व सर्व प्रकारचे गॅस. | ८.०० | .... |
| २६ | केरोसीन ऑईल .. .. .. | ४.०० | .... |
| २७ | मेणबत्त्या, गॅस किंवा तेल दिव्याकरिता आवश्यक असणाऱ्या इतर वस्तू [त्यामध्ये दिवे, कंदिल, किटसोन, पेट्रोमॅक्स, स्टोव्हज्, वाती, मेटल, बंदुकीची पावडर (दिवाळी मॅचेससह) सर्व प्रकारचे फटाके यांचा समावेश होतो], सुरुंगाची दारू, दारूकाम, फटाके, सेफ्टी फ्यूजेस, सर्व प्रकारचे विद्युत घट (सेल), विजेऱ्या, लायटर्स, गॅस ट्यूब्ज् आणि त्यांची उपसाधने व कॅल्शियम कार्बाईड. | ८.०० | .... |
| २८ | मॅचेस, दिवाळी मॅचेस वगळून .. .. | ४.०० | .... |
| २९ | चरबी व मांस, चरबीयुक्त आम्ल, वनस्पतिज व प्राणिज चरबी. | ... | १०.०० |
| ३० | खाली सविस्तर दिल्याप्रमाणे प्रत्येक वर्णनाची विजेची उपकरणे:— | | |
| | (अ) प्रशीतक, जलशीतक, वातानुकूलन यंत्र, क्ष-किरण यंत्र आणि त्याचे भाग, विद्युत-उद्वाहन, हिटर्स, सर्व प्रकारचे विजेरी संच, बहिःसर्जक पंखा, वायुसंपीडक, धुलाई यंत्र, घर-घंटी (इलेक्ट्रिक), विद्युत-भट्टी, एअर-कुलर, कुकिंग मशीन्स, गिझर, आय.बी.एम. यंत्र, सर्व प्रकारची परिगणके, डाटा यंत्र, टेलेक्स, टेलीप्रिंटर—विजेवर चालणारे किंवा विजेवर न चालणारे, लोखंडी इस्त्री, सर्व प्रकरणी इलेक्ट्रॉनिक यंत्रसामग्री—वरील बाब क्र. ३० (ब) मध्ये विनिर्दिष्ट न केलेली आणि वरील सर्व वस्तूंची उपसाधने, ट्रान्झिस्टर, टेप-रेकॉर्डर, ग्रामोफोन, इयर फोन, एअरफोन, रेडिओ, व्हिडीओ कॅसेट रेकॉर्डर, व्हिडिओ गेम कॅसेट, कॅसेट टेप्स, दूरचित्रवाणी संच, व्हिडीओ कॅसेट अणि त्याचे सुटे घटक भाग, स्टिरिओ, प्रवर्धक, दूरध्वनी, बिनतारी यंत्रणा व तार यंत्रणेची सामग्री, चलचित्र, ध्वनिवर्धक, पियानो, सर्व | १०.०० | .... |

अनुसूची—चालू

| (१) | (२) | (३) | |
|---|---|---|---|
| | | रु. पैसे | रु. पैसे |
| | प्रकारची संगीताची सामग्री, तबकडी, ग्रामोफोनच्या सुया आणि त्यांचे सुटे घटक भाग, सर्व प्रकारचे उष्मा प्रवर्तक (हीट एक्स्चेंजर). | ६.०० | .... |
| | (ब) उपकरण संच, उपकरणे, विद्युत मोटारी, जोड साधने, मातीचे व पोर्सिलीनचे इन्स्युलेटर, इलेक्ट्रोड्स, मीटर्स, विजेचे बल्ब, दिवे, टयूबलाईट, तारा (इन्स्युलेट केलेल्या किंवा न केलेल्या), सर्व प्रकाराची जनित्रे, वीज निर्मिती, पारेषण व वितरण यांसाठी विद्युत यंत्र-सामग्री आणि तिचे सुटे घटक भाग, विजेचा हॉर्न, विजेची घंटी, नियंत्रक स्विच गियर, ऑल्टरनेटर, डायनामो, पारेषण यंत्र व टर्बो जनरेटिंग संच, सर्व प्रकारची विद्युत जोड साधने व सामग्री. | ८.०० | .... |
| ३१ | सर्व प्रकारचा साबण (औषधियुक्त किंवा औषधियुक्त नसलेला), डीटर्जंट भुकटी, सर्व प्रकारची धुण्याची भुकटी, धुण्याचा सोडा, इतर लवणे, कपडे, फरशी व भांडी धुण्या-साठी वापरण्यात येणारे पदार्थ, चुरा, विरंजक चूर्ण, रिठे. | ८.०० | .... |
| ३२ | पोटॅशियम परमँगनेट, परिष्कृत व अपरिष्कृत सॉल्ट पीटर, एप्सम सॉल्ट, फिनेल, सर्व प्रकारचे पोटॅश, तुरटी, खाण्याचा सोडा, सोडियम कार्बोनेट, कॅल्शियम कार्बोनेट, गंधक, कॉस्टिक सोडा, हायड्रोसल्फेट ऑफ सोडा, नायट्रेट ऑफ सोडा आणि अन्यत्र तरतूद करण्यात न आलेला सर्व प्रकारचा सोडा आणि सर्व प्रकारची रसायने, चिंचोक्याची भुकटी, आरारोट धरून सर्व प्रकारचे पिष्टमय पदार्थ, अन्यत्र विनिर्दिष्ट न केलेले सर्व प्रकारचे मीठ, आयर्न सल्फेट, तांबे, ॲल्युमिनियम, झिंक क्लोराईड, मॅग्नेशियम क्लोराईड. | .... | ०.४० |
| ३३ | स्टीम कोळसा, स्लॅक कोळसा, दगडी कोळसा, कँडी कोळसा, कोळशाची राख आणि भुकटी. | .... | ०.५० |
| ३४ | चारकोल व भुकटी .. .. .. | .... | ०.५० |
| ३५ | जळणाचे लाकूड, पडपा, कोळपलेला कोळसा व खंगर .. | .... | २.०० |
| ३६ | (अ) सागवानाच्या फळयांव्यतिरिक्त अन्य आकार दिलेल्या व न दिलेल्या तुळया, वासे, ओंडके व मलगा व अन्य आकार दिलेले किंवा न दिलेले लाकूड. | .... | ५.०० |
| | (ब) सागाचे लाकूड, त्याचे विविध आकाराचे ओंडके व फळया. | ८.०० | .... |
| | (क) लाकडी दरवाजे व खिडक्या, लाकडी जिने, लाकडी ढलपे, लाकडी पिंपे व खोके व इतर लाकडी सामान (अन्यत्र विनिर्दिष्ट न केलेले). | | |

अनुसूची—चालू

| (१) | (२) | (३) | |
|---|---|---|---|
| | | रु. पैसे | रु. पैसे |
| ३७ | बांबू, बांबूचे तुकडे, बांबूच्या चटया, बांबूच्या टोपल्या, बांबूच्या काठ्या व इतर बांबूच्या वस्तू (बुर्डीच्या वस्तू), सळई लाकूड व त्याच्या वस्तू—फर्निचरव्यतिरिक्त आणि सागाव्यतिरिक्त अन्य लाकडाचे ओंडके (अडजात). | ... | १.०० |
| ३८ | वेत आणि त्याच्या वस्तू—वेताच्या खुर्च्या धरून, सर्व प्रकारची ताडपत्री, सर्व प्रकारचे दोरखंड, सर्व प्रकारचा ट्वाईन दोरा, सुती व इतर दोऱ्या, काथ्याच्या चटया, सणाच्या व तागाच्या वस्तू, सर्व प्रकारचे लवचिक नळ, मुंज, बाभई, काम, बाढा, सूंभ, सुतळी इत्यादींची रश्शी, नायलॉन धाग्याचे दोर व सूत, काथ्या, ताग आणि अन्यत्र तरतूद न केलेले याचप्रकारचे इतर कापड, कच्चा काथ्या, मनीला दोर, अॅस्बेस्टॉस दोर, चायना मॅट, चिक, पंखे वेत, लाकूड, पोलाद यापासून बनवलेले सर्व प्रकारचे फर्निचर व इतर कापड व त्यांच्या वस्तू, फर्निचरचे भाग किंवा संपूर्ण फर्निचर, धातूच्या किंवा अन्य प्रकारच्या कुलपे व कड्या — गृह सजावटीसाठी व सुशोभीकरणासाठी वापरण्यात येणाऱ्या इतर सर्व प्रकारच्या वस्तूंसह, उदा. चित्रे, छायाचित्रे, सर्व प्रकारच्या तसबिरी, मूर्ती, पुतळे, खाटा, चालण्याच्या काठ्या, नक्षीच्या वेताच्या काठ्या, चाबूक, घडीच्या खाटा, मच्छरदाणीच्या चौकटी, प्लायवूड, सनमायकाच्या फळ्या, लिनोलियम, लॅमिनेटेड पत्रे, उन्हाळी काचा, सर्व प्रकारचे नक्षीदार पत्रे, घडीचे पडदे, खिडक्या, दारे, नक्षीदार पडदे, त्यापासून तयार केलेल्या वस्तू-अंशत: किंवा पूर्णत:, पडद्यांचे अँगल्स, इतर सर्व प्रकारच्या शिड्या, गोल्फ, टर्बाईन गोल्फ आणि सर्व प्रकारच्या शिड्या, गोल्फ, टर्बाईन गोल्फ आणि सर्व प्रकारचे झाडू (शिंदीपानाच्या झाडूव्यतिरिक्त), हार्डबोर्ड, मॅसोनाईट किंवा कोणत्याही घटकांपासून कृत्रिम प्रक्रियेने बनवलेला लाकडाचा अन्य कोणताही प्रकार व त्यापासून बनवलेल्या वस्तू, प्राण्यांचे केस व मोराची पिसे. | ८.०० | ... |
| ३९ | नवीन गोणपाट .. | ... | २०.०० |
| ४० | सण आणि सोनताग .. .. .. | ... | १०.०० |
| ४१ | जुने गोणपाट .. .. | ... | ४.०० |
| ४२ | (अ) गावठी कौले व विटा .. | ... | ०.३० |
| | (ब) भाजलेल्या विटा, भगरा, मंगलोरी व अलाहाबादी कौले—छपरासाठी व चुना. | ... | ०.६० |
| ४३ | झळाळी दिलेल्या विटा, जमिनीसाठी फरशा, फरशांचे दगड व सिमेंटच्या फरशा, गुळगुळीत केलेले किंवा न केलेले संगमरवरी दगड व त्यापासून बनवलेल्या वस्तू, | ८.०० | .... |

अनुसूची—चालू

| (१) | (२) | (३) रु. पैसे | रु. पैसे |
|---|---|---|---|
| | काचसामान, काच, काचेच्या वस्तू, चिनीमातीच्या वस्तू, एनॅमलची भांडी व त्यापासून बनवलेल्या वस्तू, ग्लास बुल दगडाचे कपचे, मोझेक संगमरवरी दगड व त्याचे इतर प्रकार. | | |
| ४४ | फरशीचा दगड (फरसबंदीसाठी वापरण्यात येणारा फरांदा), सिलबट्टा, चक्कीचा दगड, उखळी, कुंडी, बरणी, शौचालयाची भांडी, शौचकूप व मुतीसाठी लागणाऱ्या वस्तू व त्यांचे भाग धरून, सिमेंट, कोलटार, बिटूमेन, चायना पाईप, मातीचे नळ, सिमेंटचे नळ, ॲस्बेस्टॉस, ॲस्बेस्टॉसच्या वस्तू, सिमेंटचे पत्रे, मँगनीज, कुरुंदाचा दगड व चुरा, कुरुंद लावलेले कापड, चिनीमाती, विटांची माती, गेरु, पिवळी माती, कागद, खडूची भुकटी, प्लास्टर ऑफ पॅरिस, डोलोमाईट दगड व चुरा, साबणाचा दगड व चुरा, रांगोळी व इतर खनिज भुकटी व दगड (अन्यत्र विनिर्दिष्ट न केलेले), सागोळ सिमेंट, छतासाठी फेल्ट, सर्व प्रकारची माती व वाळू—अन्यत्र तरतूद न केलेली, सागोळी किंवा इतर कोणतीही सिमेंटची भुकटी यांसारखी नेहमीची भुकटी सोडून इतर सर्व भुकटी. | ८.०० | .... |
| ४५ | काचेच्या बांगड्या .. .. .. | ... | ५०.०० |
| ४६ | गोटे, गरगडा, वाळू (इमारतीच्या बांधकामासाठी वापरावयाचे), पांढरी माती (मळमाती), रोडे दगड, चुनखडी, मुरुम व गिट्टीची भुकटी. | ... | ०.२५ |
| ४७ | गिट्टी, बाजरी गिट्टी खांडकी, लांबट दगड, पिवळा दगड, गेरुचा दगड व चुनखडीचा दगड. | ... | ०.४० |
| ४८ | रोगण, व्रासो, सर्व प्रकारचे लाकडाचे पॉलिश, वॉर्निश, रंग, उकळवलेले किंवा दोनदा उकळवलेले अळशीचे तेल, सौम्यकारी द्रव्य (थिनर), कातडी कमावण्यासाठी छपरा—लाख साल, घाऊट फळ आणि रंग किंवा रंगद्रव्य तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या परंतु अन्यत्र तरतूद न केलेल्या इतर सर्व गोष्टी, लाख, लाखेचे तुकडे, टर्पेन्टाईन, रंग, रासायनिक रंग, राजण, शिरस, चंद्रस, अभ्रक, रंगवण्याची शाई, रंगद्रव्य, पेस्ट व इंडिगो, स्नोसेम सिमेंट, रंगीत सिमेंट, सर्व प्रकारचे सिमेंटचे रंग, डिस्टेंपर, झिंक ऑक्साईड व रेड ऑक्साईड आणि इमारती रंगवण्यासाठी वापरण्यात येणारे इतर साहित्य व रॉबिन ब्लू. | ८.०० | .... |
| ४९ | मेथिलयुक्त स्पिरिट, शुद्ध केलेले स्पिरिट व औषधांमध्ये वापरण्यात येणारे इतर प्रकारचे स्पिरिट आणि मद्यार्क. | ८.०० | .... |

अनुसूची—चालू

| (१) | (२) | (३) | |
|---|---|---|---|
| | | रु. पैसे | रु. पैसे |
| ५० | रासायनिक खते, खतांचे रसायन, सर्व प्रकारची कीटकनाशके (द्रवरूप व भुकटीरूप), औषधियुक्त सरबत, पाईनचे तेल, लवंगांचे तेल, बदामाचे तेल, चंदनाचे तेल, बावची तेल, बिब्ब्याचे तेल, निंबाच्या बियांचे तेल, राईस फॅटी तेल, राईस बोरू तेल आणि खाद्यतेल म्हणून वापरण्यात न येणारी इतर सर्व प्रकारची तेले (अन्यत्र तरतूद न केलेली), औषधिद्रव्ये आणि ॲलोपॅथीची औषधे, होमिओपॅथी, यूनानी व आयुर्वेदिक औषधे, सुरमा, काजळ, दंतविषयक सामग्री, बोरिक ॲसिड व इतर द्रवरूप ॲसिड, पारा. | ५.०० | .... |
| ५१ | जडीबुटी व आयुर्वेदिक औषधे तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल (तळटीप क्र. २ अनुसार). | ५.०० | .... |
| ५२ | लिकर, व्हिस्की, सर्व प्रकारची ब्रँडी, ताडी, देशी दारू, अफू, चरस, गांजा, भांग, चंडू, कोकेन. | २५.०० | .... |
| ५३ | व्हॅसलिन, पोमेड, फेस क्रीम, केश तेल, प्रसाधनविषयक आवश्यक सामग्री, फेस पावडर, कंगवे, ब्रश, आरसे, काल्या, वस्तरे, पाती, सुऱ्या, चाकू, स्प्रिंग बटणे, हूक, बटणे, रिंग, सर्व प्रकारच्या चाकू-सुऱ्या, अर्क, सुवासिक तेल, सुवासिक पाणी, अत्तरदान व त्याच्या कुप्या, हॅटच्या पिना, सर्व प्रकारचे ब्रोचेस, गार्टर्स, इलॅस्टिक कॉर्ड, इलॅस्टिकच्या वस्तू, निलंबक, कोट हँगर्स, थर्मास, अन्नपदार्थांच्या बरण्या, भरतकामाची यंत्रे, लाकडी रिंगा, किंवा धातूच्या सुया, विणकामाच्या सुया, पटवाज, टिकली, लेस, फीत, यांसारखा बिसतखान माल, डागपान, ॲल्युमिनियमचा पातळ पत्रा, स्टॅग्रिटी, टारगेखरू व धातूच्या वस्तू, सर्व प्रकारच्या मॅजिना, हाडापासून बनवलेला सर्व माल व वस्तू, सर्व प्रकारची कुलपे व किल्ल्या, नकली दागिने, सर्व प्रकारची बुचे व बाटल्यांची झाकणे, कवडी, पानदान, गुलाबदाणी, मेंदी पावडर, सर्व प्रकारच्या टूथपेस्ट व पावडरी, सर्व प्रकारचे ब्रश, सर्व प्रकारचे बेगड (पन्नी), फीती (ribbon), साडी फॉल, राखी, मणी व सुताच्या वस्तू, सुगंधी तेल व सर्व प्रकारचे सुगंध व अत्तरे, डांबराच्या गोळ्या. | १०.०० | .... |
| ५४ | तंबाखू, बिछोरस, फडी, सरेस, चुरा, पाला, धानथाल, विडी उत्पादनासाठी लागणारा तंबाखू, खाण्याच्या प्रयोजनासाठी लागणारा तंबाखू, तंबाखू व तंबाखूच्या कांड्या व सर्व प्रकारच्या विड्या. | .... | १२.०० |
| ५५ | सिगरेट व सिगार, सिगरेट होल्डर, धूम्रपानाचा पाईप, सिगरेटचा कागद, तंबाखूच्या डब्या, नैचा, हुक्का, निगळी व इतर धूम्रपानविषयक आवश्यक वस्तू, फरशी कळी व कुलफी सिगरेट तंबाखू. | १०.०० | .... |

अनुसूची—चालू

| (१) | (२) | (३) | |
|---|---|---|---|
| | | रु. पैसे | रु. पैसे |
| ५६ | विडीची पाने .. .. .. | .... | ५.०० |
| ५७ | सर्व शुद्ध लोकरी व रेशमी माल व कापड, सूत व लोकर यांचे आणि सोने किंवा जर (खरी किंवा खोटी) अथवा इतर धातू यांचे मिश्रण तसेच पूर्णतः किंवा अंशतः वरील कोणत्याही कापडापासून बनवलेले सर्व नवे पोषाख, कोसा, केतकी, पॅराशूटचे कापड, शार्कची कातडी, लोकरी टोपीचे कापड व लोकरी विणमाल-मग तो शुद्ध किंवा मिश्र असो, टेरीकॉटचे कापड, टेरिलीनचे कापड, सर्व प्रकारचे तयार सुती पोषाख, सर्व प्रकारचे विणकाम, हॅट, हॅटची सामग्री, टोपी, टोपीची सामग्री, सर्व प्रकारची नवार, कॅन्व्हासचे तंबू, आरेखनाचे कापड, पुस्तक बांधणीचे कापड, खेळ व क्रीडा यांच्या प्रयोजनासाठी लागणारा पडदा किंवा जाळी, चित्रपटाचे पडदे, जलरोधक कोट, सर्व प्रकारचे रेनकोट, तैलकापड, कॅन्व्हासचे तंबू, फोमलेदरचे कापड, सर्व प्रकारचे रेक्झीनचे कापड, नायलॉन व इतर (नायलॉन धागामिश्रित पी.व्ही.सी.) कापड, टेरीन, पॉलीस्टर व इतरत्र विनिर्दिष्ट न केलेले सर्व प्रकारचे कापड. | ६.०० | .... |
| ५८ | सर्व सुती कापडाचा माल, खेड्यातील धनगरांनी तयार केलेली कांबळी व नमदा आणि हातमाग व यंत्रमाग यांवर बनविलेले अदनथ व सुती कापड यांचे मिश्रण, बनियनचे सुती कापड, सर्व प्रकारचे छत्र्यांचे कापड, सॅनिटरी कापूस व शस्त्रक्रियेसाठी लागणारा कापूस, बँडेजचे कापड, सुती बँडेज व सॅनिटरी टॉवेल यांसारखा निर्जंतुक माल, खादी चरखा संघ किंवा खादी चरखा मंडळ यांनी प्रमाणित न केलेले खादीचे कापड (सुती) व गोणपाटाचे कापड. | ५.०० | ... |
| ५९ | (अ) सर्व सूत नंबरांचा व विरंजन न केलेला पिळाचा दोरा व सूती दोरा. | ३.०० | .... |
| | (ब) विरंजन केलेला बिनपिळाचा तागाचा दोरा, सुती पिळाचा दोरा, नॉयलॉनचा दोरा, सुती दोऱ्याव्यतिरिक्त इतर तंतुक दोरा, सर्व प्रकारचे पॉलीस्टर कापड व पॉलीस्टर धागे, सर्व प्रकारचे शिवणदोरे. | ६.०० | .... |
| ६० | दाब दिलेल्या, सरकी काढलेल्या किंवा न काढलेल्या कापसाच्या गासड्या, दाब दिलेल्या टाकाऊ कापसाच्या गासड्या. | .... | प्रत्येक गासडीला १०.०० |
| ६१ | बी असलेला किंवा बी विरहित अपरिष्कृत कापूस व काटसवार कापूस. | .... | २.०० |
| ६२ | कठीण व मृदु टाकाऊ कापूस, मृदु व कठीण टाकाऊ रेशीम, पिळाचे व बिनपिळाचे टाकाऊ कापसाचे सूत. | .... | १०.०० |

अनुसूची—चालू

| (१) | (२) | (३) | |
|---|---|---|---|
| | | रु. पैसे | रु. पैसे |
| ६३ | (अ) रबरी माल, पी.व्ही.सी. माल व अल्कली गटपर्चा, सेल्यूलॉईड, अभ्रक (मायका) व इतरत्र तरतूद न केलेल्या पूर्णत: किंवा अंशत: त्याच्यापासून बनवलेल्या वस्तू, रबर द्रावण, प्लास्टिक व त्यापासून बनवलेल्या वस्तू, रबरी कापड, सर्व प्रकारचे प्लास्टिक, सेल्यूलॉईड, पॉलीथीन, नायलॉन वस्तू, सोल्यूशन पेस्ट, चिकट पदार्थ ( adhesive ), सर्व प्रकारचे फेव्हीकॉल, गोंद, सर्व प्रकारच्या ट्यूबिंग व पाईप आणि त्यापासून बनवलेल्या पाईपच्या जोडण्या व वस्तू, बॅकोलाईटचे ताव, हेअर बेल्टींग, सर्व प्रकारचे बेल्टींग, बॅकोलाईटच्या वस्तू, चिकट कागद, कापड व फीत, सूटकेस, फाईल केस, फाईल बॅग, ॲटॅची, नायलॉनच्या पिशव्या, प्लास्टिकच्या पिशव्या (सुती पिशव्यांव्यतिरिक्त), प्लास्टिक कागद व ताव, स्पंज, फोम व थर्माकोल, प्लास्टिक नवार. | ८.०० | .... |
| | (ब) प्लास्टिकचे ग्रॅन्यूल, अल्कथाईन, पी.व्ही.सी. सेल्यूलॉईड व त्याची भुकटी, टॅब्लेट (गिट्टी) व या प्रकारची इतर भुकटी, ग्रॅन्यूल, कच्चे रबर व लॅटेक्स. | ६.०० | .... |
| ६४ | वाळवलेले कातडे, कमावलेले चामडे, चामड्याचे कात्रण, क्रोम चामडे, चामड्याची लेस व यंत्रनिर्मित चामडे. | .... | २०.०० |
| ६५ | कच्चे कातडे, चामडे व हाडे, चटई व रग म्हणून वापरण्यात येणारे प्राण्यांचे चामडे व क्रोम आणि प्राण्यांची सर्व प्रकारची शिंगे. | .... | १०.०० |
| ६६ | जोडे, खोगीर, बूट, सॅंडल्स, चपला व अनुसूचीमध्ये अन्यथा तरतूद न केलेल्या इतर वस्तू, बूट पॉलीश व ब्लॅंको. | १०.०० | .... |
| ६७ | विशेष रीत्या तरतूद करण्यात आलेल्याव्यतिरिक्त पुढील-प्रमाणे धातू व धातूच्या वस्तू:— | | |
| | (अ) तांबे, पितळ, शिसे, ब्रॉंझ, जस्त व जस्ताच्या पट्ट्या, काशाचा पत्रा, जर्मन सिल्व्हरचा पत्रा, ॲल्युमिनियमचे पत्रे, कडी व निकल धातू. | .... | ३०.०० |
| | (ब) स्टेनलेस स्टीलचे पत्रे, कडी, व्हाईट मेटल, गन मेटल, कथिलाचे (कल्हई) पत्रे, कडी व वरील (अ) मध्ये तरतूद न केलेले इतर प्रकारचे धातू. | .... | ५०.०० |
| | (क) अलोह धातूचे भंगार व सर्व प्रकारच्या विटा, सर्व धातूंची भुकटी, बुरड (छिल्लन) व त्यांचा कीस, टाकाऊ ॲल्युमिनियम पत्री व खिळचांचा धातू. | .... | १०.०० |

अनुसूची---चालू

| (१) | (२) | (३) | |
|---|---|---|---|
| | | रु. पैसे | रु. पैसे |
| | (ड) अनोडाईझ्ड व्हाईट मेटल, तांबे, पितळ, ब्रांझ, कासे, ॲल्युमिनियम व अन्यत्र नमूद न केलेली इतर धातूंची भांडी. | .... | ४०.०० |
| | (ई) ई.पी.एन.एस., जर्मन सिल्व्हरच्या वस्तू, हिंदालियम, डोनेलियम, मिश्रधातूच्या वस्तू (भरत), सर्व प्रकारचे कुकर, प्रेशर कुकर, मुरादाबादी वस्तू (मीनाकारी), खाद्यान्न बनविण्यासाठी वापरण्यात येणारे सर्व प्रकारचे हातसाचे, खोबऱ्याची किसणी, शेवई यंत्र, शिवण यंत्र, हाताने चालवावयाची घरघंटी, अन्यत्र नमूद न केलेली घरगुती हत्यारे व इतर स्वयंपाकाच्या वस्तू, सर्व प्रकारचे चमचे व काटे. | १०.०० | ... |
| | (फ) स्टेनलेस स्टीलचा माल .. .. | .... | ५००.०० |
| ६८ | (अ) सोने व सोन्याचे दागिने आणि सोन्यापासून बनवलेल्या वस्तू. | .... | १५.०० (दर १० ग्रॅमला) |
| | (ब) चांदी व चांदीचे दागिने आणि चांदीपासून बनवलेल्या वस्तू. | .... | १५.०० (दर किलोला) |
| | (क) विद्युतलेपित वस्तू व दागिने यांसह सर्व विद्युतलेपित माल, क्रीडा ढाली, इत्यादी. | १०.०० | .... |
| ६९ | (अ) लोखंड, पोलाद व सौम्य पोलाद, घडीव लोखंडाचा तुकडा म्हणजेच तुळ्या, पन्हळी, रुळ, अँगल्स, चक्रे, चौरस, पट्टया, सायर, कांबी, फिशप्लेट, काळे किंवा जस्तविलेपित पत्रे, साधे किंवा पन्हळीदार पत्रे, पट्टया, बॉयलर पत्रे व उच्च ताणाचे आणि बंदुकीच्या गोळ्यांना अभेद्य असे पत्रे यांसह सर्वसाधारण सौम्य पोलाद, सळ्या, तारायंत्राच्या वापरासाठी काळ्या व जस्त विलेपित तारा किंवा उपरोल्लेखित वस्तूंच्या आकाराच्या किंवा वेगळ्या आकाराच्या इतर प्रकारच्या लोखंडी तारा आणि बीड. | .... | ८.०० |
| | (ब) लोखंडापासून बनवलेल्या सर्व वस्तू व तयार माल, पोलाद, सौम्य पोलाद, बीड, घडीव लोखंड, कच्चे लोखंड, हातोडे, कुदळ, कुऱ्हाड, फावडे, कुदळी, सब्बल यांसारख्या वस्तू, सर्व प्रकारच्या लोखंडाचे नळ व नळ्या, जुनी व नवी पिंपे (रिकामी), रिकामे सिलींडर, रिकामे पत्र्याचे डबे, लोखंडी टँकर व टाकी, घमेले, काटेरी तार, लोखंडी टोपली, लोखंडी शेगडी, तवा, कढई, सर्व प्रकारची बांधकामविषयक सामग्री व लोखंडी वस्तू, बोल्ट, फिरकी, | ६.०० | .... |

१०७

अनुसूची—चालू

| (१) | (२) | (३) | |
|---|---|---|---|
| | | रु. पैसे | रु. पैसे |
| | वायसर, रिबीट व अशा इतर वस्तू, तारखिळे, हूक व पट्ट्या आणि बांधकामासंबंधातील सर्व प्रकारचे जोडभाग लोखंडी सामग्री, छत्र्या व छत्र्यांचे जोडभाग आणि सर्व प्रकारच्या लोखंडी सामानाचे जोडभाग. | | |
| | (क) केवळ पुन्हा वापरासाठी व पुन्हा वितळविण्यासाठीच आणलेल्या सदोष, नाकारण्यात आलेल्या व खराब झालेल्या लोखंडासह भंगार लोखंड, लगडी, ब्लूम, लाद्या व विटा, मोटार व यंत्रसामग्री यांची जुनी व वापरलेली निरुपयोगी भंगार सामग्री, भुकटी व बुरडी (छिल्लन), सर्व प्रकारच्या लोखंडाचा कीस, कच्चे लोखंड. | ... | ३.०० |
| ७० | सर्व प्रकारची यंत्रे, रस्ता बनविण्याची यंत्रे व इतरत्र विनिर्दिष्ट न केलेले पूर्णत: किंवा अंशत: तयार किंवा अपरिष्कृत असणारे त्यांचे घटकभाग, सर्व प्रकारची हत्यारे, मुद्रण ठसे, सर्व प्रकारची शेतीची अवजारे, सर्व प्रकारच्या नळ जोडण्या, नळचा, सर्व प्रकारच्या धातूच्या पट्ट्या व आवेष्टन सामग्री, मापन व यांत्रिक फीत, रोटा मुद्रण यंत्र, मुद्रणयंत्रे व लिथो यंत्रे, पट्ट्याच्या करवतीची पाती व पट्ट्याच्या करवतीचे ब्लॉक, पट्ट्या, यंत्रांशी संबंधित लाटांच्या माळा, लोखंड, जस्त, शिसे, तांबे, पितळ, कथिल, जर्मन सिल्व्हर, कांसे, मिश्रधातू, व्हाईट मेटल, ॲल्युमिनियम, स्टेनलेस स्टील (इतरत्र विनिर्दिष्ट न केलेले) व इतर धातूचा माल व बागकामाची हत्यारे. | ६.०० | .... |
| ७१ | (१) मोटार, मोटार सायकली, ऑटो रिक्शा, ऑटो सायकली, मालमोटारी, कर्षित्रांचे साटे, लॅम्ब्रेटा— | | |
| | (अ) सर्व प्रकारच्या मोटारी, जीप, मेटॅडोर, स्टेशन वॅगन, मिनिबस, छोटे सामान यान (मिनी लगेज व्हॅन), उचलयान व तीनचाकी वाहन इत्यादी. | ... | प्रत्येकी २,०००.०० |
| | (ब) मालमोटारी व त्यांचे सर्व प्रकारचे साटे, बुलडोझर, डंपर, बसेस व मालमोटार टँकर. | ... | प्रत्येकी ३,०००.०० |
| | (क) सर्व प्रकारची कर्षित्रे व रोड रोलर .. | ... | प्रत्येकी ८००.०० |
| | (ड) मोटार सायकली व १.५० व अधिक अश्वशक्तीच्या स्कूटर. | ... | प्रत्येकी २००.०० |
| | (ई) ऑटो सायकली व १.५० पेक्षा कमी अश्वशक्तीची इतर तत्सम वाहने. | ... | प्रत्येकी १००.०० |

अनुसूची—चालू

| (१) | (२) | (३) | |
|---|---|---|---|
| | | रु. पैसे | रु. पैसे |
| | (२) मोटारगाड्या, मोटारसायकली, ऑटो-सायकली, ऑटो रिक्शा, मालमोटारी, कर्षित्रे (ट्रॅक्टर्स), लॅम्ब्रेटा, व्हेस्पा, विमान, हेलिकॉप्टर यांचे सुटे व घटक भाग, सर्व प्रकारची बेअरिंग्ज, टंकलेखनयंत्रे, प्रतिलिपी यंत्रे, झेरॉक्स यंत्रे, मनगटी घड्याळे, मोठी घड्याळे व त्यांचे घटक भाग, नेत्रविषयक वस्तू, शिवणयंत्रे, पिकोयंत्र, भरतकाम यंत्र, शिवणकामाच्या प्रयोजनांसाठी वापरण्यात येणारे झिग-झॅग यंत्र व इतर प्रकारची यंत्रे व त्यांचे घटक भाग, सर्वेक्षण उपकरणे, वैज्ञानिक व प्रयोगशाळाविषयक वस्तूंसह शास्त्रीय उपकरणे, सर्व प्रकारच्या शस्त्रक्रियाविषयक वस्तू, अग्निशमन यंत्रे, वाहतुकीची वाहने व अन्यत्र तरतूद करण्यात आली असेल त्याखेरीज सर्व प्रकारची प्रवासी वाहने, मुलांची हातगाडी (परॲम्ब्युलेटर्स) बाबागाडी, वरील सर्व वस्तूंचे सुटे भाग व घटकभाग, घड्याळाचे पट्टे, चष्मे व त्यांची घरे, मौल्यवान खडे, अनुयाने व जोडयाने व त्यांची उपसाधने. | ८.०० | .... |
| ७२ | सायकली, तिचाकी सायकली, सायकल रिक्शा व त्यांचे सुटे भाग, सायकल डायनामो, सायकलचे दिवे, सायकलचे पंप व त्यांच्या तोटया, झडपा असलेल्या नळया, आरायंत्र, इत्यादी. | ६.०० | .... |
| ७३ | सर्व प्रकारच्या रबरी धावा, नळया व पाळ .. | ६.०० | .... |
| ७४ | सर्व प्रकारची शस्त्रे व दारूगोळा .. .. | १२.०० | .... |
| ७५ | वर्तमानपत्राचे कागद .. .. .. | .. | ५.०० |
| ७६ | सर्व प्रकारचे कागद, मिलबोर्ड, हार्डबोर्ड, कार्डबोर्ड, आवेष्टनाचा कागद व कागदी पिशव्या, सर्व प्रकारची लेखनसामग्री, कागदावर ठेवावयाचे वजनगोळे, विजेवर न चालणारी घंटी, फाऊंटन पेने, सर्व प्रकारची बॉलपेने व त्यांची उपसाधने, कोरे कागद व हेडिंग प्रिंटींगचा कागद, लेखा खातेवह्या, सर्व प्रकारच्या नोंदवह्या, लिफाफे, नमुने, सर्व प्रकारची मुद्रणाची व लिहिण्याची शाई, पेन्सिली, निब्ज, पोस्टकार्डे व कार्डांचे ताव, दैनंदिन्या, कॅलेंडरे व कॅलेंडर पट्टया, ख्रिसमस कार्डे, वाढदिवस व दिवाळी भेटकार्डे व इतरत्र उल्लेखिण्यात न आलेली इतर कार्डे, सर्व प्रकारची जाहिरात सामग्री, जाहिराती छापलेला कागद व वस्तू, शोषण नळया (सकिंग पाईप्स) व स्ट्रॉ पाईप्स, छिद्रक यंत्र (पंचिंग मशीन), स्टेपल पिन मारण्याचे यंत्र, सर्व प्रकारच्या रिफिल्स, चित्रकला व मुद्रण सामग्री, अनुरेखन वस्त्र व कागद, अमोनिया क्लॉथ व कागद, जिलेटिन कागद, चकचकीत कागद, उमटरेखित कागद, वॉलपेपर व सर्व प्रकारच्या कागदी वस्तू व कार्डबोर्डच्या | ६.०० | ... |

अनुसूची—समाप्त

| (१) | (२) | (३) | |
|---|---|---|---|
| | | रु. पैसे | रु. पैसे |
| | व मिलबोर्डच्या पेटचा, पाटचा (स्लेटस्), सूच्या, माहिती पत्रे, नावाच्या पाटचा व निऑन साईन्स. | | |
| ७७ | व्यायाम व क्रीडाविषयक वस्तू, व्यायामशाळाविषयक वस्तू, सर्व प्रकारच्या मैदानी व अंतर्गेही खेळांचे सामान, (फोटो केमिकल्स व्यतिरिक्त) छायाचित्रणविषयक वस्तू, कॅमेरा, फोटो आल्बम, फोटो फिल्म्स, क्ष-किरण चित्रफिती, सिनेमा कार्बन, फोटो माऊंटस् व फोटोग्राफिक यंत्रसामग्री व त्यांचे घटकभाग, त्यात वापरण्यात येणारे सुटे भाग व सामग्री व सर्व प्रकारची खेळणी. | १०.०० | .... |
| ७८ | जुन्या व रिकाम्या काचेच्या बाटल्या, रद्दी कागद, जुनी वर्तमानपत्रे, रद्दी कागदाची कात्रणे, रद्दी मोनो कागद, रस्ता झाडायचा कागद, सर्व प्रकारच्या जुन्या किंवा नव्या चिंध्या, जुने व वापरलेले कपडे व साड्या, काचेचा भंगार, शंख व कपच्या, जुना व वापरलेला खर्डा किंवा कार्डबोर्डच्या पेटचा, जुन्या व वापरलेल्या लाकडी पेटचा, सर्व प्रकारचा मिलबोर्ड व खर्डा यांचे भंगार. | ६.०० | .... |
| ७९ | चित्रपटाच्या फिती व त्यांचे परिचय पट .. | .. | दर १०० मीटर्स लांबीच्या फिती-करिता ३.००. |
| ८० | जुने निरुपयोगी रबर, प्लॅस्टिक, पी.व्ही.सी., नायलॉन, भंगार माल, निरुपयोगी धावा व नळचा सर्व प्रकारचे जुने बूट व चपला, सुरई, रांजण, मडके, दिवनळे, चिलिम इत्यादीसारखी मातीची भांडी. | .. | ६.०० |
| ८१ | अन्य कोणत्याही शीर्षाखाली अन्यथा सूट देण्यात आली नसेल अशा व आकारण्यायोग्य नसलेल्या इतर सर्व वस्तू. | ६.०० | .... |

तळटीप क्रमांक १ :—

**किराणा वस्तू**

बाब क्रमांक २४(ब)

(अ) अज्वान, आंबे हळद, अज्वान फूल (ठंडाई), अगरबत्ती
(ब) बुक्का, भगर
(क) चाडीला
(ड) दालचिनी, धूप, सुंठ
(ई) गुलाल, गुलाब कळी
(फ) हिंग व हिंगाची पूड, हवन सामग्री
(ग) जिरे
(ह) खसखस, खसखशीची बोंडे, केशर, कस्तुरी, काकडीच्या बिया, काळे मीठ, कुंकू, कळोंजी
(आय) लोभण
(ज) मैदा लाकडी भुकटी

(के) नागकेशर, नवसागर

(ल) उद

(म) पापडखार

(न) राळ, रसकापूर

(ओ) सिंदूर, शहाजिरे, शिकाकाई, शेंदेलोण (खरे व कृत्रिम), चंदन व चुरा

(प) तेजपान, टरबूज बिया, ठंडाई मसाला.

तळटीप क्रमांक २ :—

जडीबूटीच्या वस्तू व कच्ची सामग्री

बाब क्रमांक ५१

(अ) अक्कलकाढा, अहळीव, अटिविक, अचकंद, अजमोडा, असमन, आवळकाठी, अरगंज, अळीसबितर व सर्व प्रकारची आसवे, असरबेले.

(ब) बोळ, बांगडखार, बेहडा, बडीभई, बकवोण, बचकुवा, दफ्तिया, बिचकुंद, बिचंदी, बाणसई-गाडा, बेहंडसंग, बोणसलोचण, बाळहिरडा, बिब्बा व बिब्बाकूळ, भरंग, भूरंग, भुईकोणी, भारंसिगफळ, भोजपत्र, भोजपत्ता, भुईनीम.

(क) चोपचिनी, चिरायता, चुईकली, चक्री, छोटामाई, चकचुकीच्या बिया.

(ड) डिकेमाली, दुर्लभ, देवदार, देवडेगिरी, दारुडेल, दाणा, धायतूळ, धावडशिंग, धावडा, धावडेफूल.

(ई) गोरंजन, गंधकबिरुज, गव्हला, गोखरू, गळे, गंडबीन, गुलाबकेशव, गुडेवळसतुसे, गुंभोज, गंधनल, गवरपट.

(फ) हिरडा (मोठा व लहान), हर्जेतजोहर, हिंगनळ, हिरमुंजी, हिरडी, हरटी, हिराकाशी, हरतळ, हडजोडबेल.

(ग) इंद्रजिरे, इसबगोल व इसबगोल भुसा, इसबरख.

(ह) जवथी, जवाखार, जैम, जस्तभंध, जातिमशी, जंगली, जाविरी, जंगली लवंग, जेस्ताफूल, जगोळ, जमालगोटा.

(आय) कमळी, कचरई, काचोरा, कुचला, कापूरचिनी, कापूर, कसणी, काकडशिंगी, कोष्टा, कोरंजन, कचनी, कचकुरी, काळकापरी, कबाबचिपळा, कबाबचिनी, कमरकस, काळी खाजर, कबाब-उठा, काटकी, कमळगोट्टा, कमिला, कहू, कणखार, खूबकला, खटुणी, कायतल काडी, कळकामणी,

(ज) लोध, लहंदी, लाभूच, लाजवंती.

(क) मदनसोहग, मगनमस्त, मोरचून, मैकैया, मुरुडशेंग, मंजिष्ठा, मुसळी, मोहकस, मुकासनी, मुर्डशिंग, मिरे, मजिफळ, मेग, मजिठ, मायफळ, मदलकाडी.

(ल) नारकिखई, नरकाचूर, नईकाई, निशोबोध, नखुला, निर्गुडीच्या बिया, निर्गुडी काळी नागरमोथा, नताफू, नकाश्विमिय, नभ.

(म) पिंपरीमूळ, पिंपरी (मोठी व लहान), पळसपाला, पळहनमेड, पान्नज, पित्तपापडा, पतिता, पावळकाडी, पिस्ताफूल, पवाडी-पळसफूल, पितकोडी.

(न) रज, रसशेंदूर, रुमामस्तकी, रसवंती, रेवचिनी, रविसुंठ, रक्षर्ची, रजहसव, रातपीड, रकचिनी, रक्तचंदन.

(ओ) शिवकर्ण, शिलाजीत, सोगतवी, साईफळ, सज्जिखार, सलाममिश्री, सोनामकई, सुवर्णमुखी, सेवज, समुद्रसोख, समुद्रफूल, समुद्रफेस, सहेज, समूळजी, सर्पसळी, सुपारीफूल, सूर्पणवरी, शिलारस सळी, सुखर, सुरजवर्णी, सागरगोटा, सोनकडुक, शतावरी, सोहनी, सुगणवल्ली, सर्पगोंडा, संकतुक, सोहगी, सोहग, शिग्रूप व सोनल.

(प) टाकणखार, तालीमखाना, तुकमराई, तुकुमबाळुंग, तगर.

(क्यू) वेखंड, वरिकंरवल, विष्णुकांता, वावडिंग."

३. (१) कोणतेही न्यायालय किंवा कोणतेही प्राधिकरण यांच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात किंवा नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (यात या पुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या तरतुदींमध्ये व त्याखाली केलेल्या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, शासकीय अधिसूचना, नगरविकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभाग क्र. एनएमसी.५३६१/२९५७३–सी, दिनांक १६ मे १९६६, नगरविकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभाग क्र. एनएमसी. २८७३/ ७२०५४/सी–दोन, दिनांक २० एप्रिल १९७४, नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. एनएमसी.–१६७८/९०३/यूडी–४, दिनांक १० डिसेंबर १९७९ व नगरविकास विभाग क्र. एनएमसी. २४८४/३६३/३–सीआर–५०/८४–यूडी–२३, दिनांक २१ सप्टेंबर १९८४ यात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दरांनी मालावर वेळोवेळी आकारण्यात आलेला किंवा आकारण्याचे अभिप्रेत असलेला जकात कर तसेच अशा प्रकारे आकारण्यात आलेला कोणताही जकात कर बसविणे, त्याची आकारणी करणे, फेरआकारणी करणे, तो गोळा करणे किंवा त्याची वसुली करणे यांच्या संबंधात, दिनांक १५ डिसेंबर १९६० रोजी व तेव्हापासून करण्यात आलेली कोणतीही कारवाई किंवा गोष्ट ही, अशा जकात कर बसविण्याच्या, त्याची आकारणी करण्याच्या, फेरआकारणी करण्याच्या, तो गोळा करण्याच्या, वसुली करण्याच्या किंवा कारवाई किंवा गोष्ट करण्याच्या वेळेस जणू काही हा अधिनियम व कलम २ मध्ये निर्दिष्ट केलेले नियम सतत अमलात होते असे समजून मुख्य अधिनियमाअन्वये व त्याखाली केलेल्या नियमांअन्वये यथोचितरीत्या असा जकात कर बसविण्यात, त्याची आकारणी करण्यात, फेर आकारणी करण्यात, तो गोळा करण्यात किंवा त्याची वसूली करण्यात आल्याचे किंवा कोणतीही कृती किंवा गोष्ट करण्यात आल्याचे समजून ती वैध व परिणामक असल्याचे मानण्यात येईल आणि तद्नुसार,—

विधीग्राह्यकारी तरतुदी व व्यावृत्ती. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.

(अ) कोणत्याही महापालिकेने किंवा तिच्या कोणत्याही प्राधिकरणाने अधिकाऱ्यांनी किंवा कर्मचाऱ्यांनी जकात कर लादणे, त्याची आकारणी करणे, फेरआकारणी करणे, तो गोळा करणे किंवा त्याची वसुली करणे यासंबंधात केलेल्या सव कृती, कायवाही किंवा गोष्टी ह्या, सर्व प्रयोजनां करिता, कायद्यानुसार करण्यात आल्याचे व त्या नेहमीकरिता कायद्यानुसार करण्यात आल्याचे मानण्यात यईल ;

(ब) अशा प्रकारे लादण्यात आलेल्या, आकारणी करण्यात आलेल्या, फेरआकारणी करण्यात आलेल्या, गोळा करण्यात आलेल्या किंवा वसूल करण्यात आलेल्या कोणत्याही जकात कराच्या परताव्यासाठी कोणत्याही न्यायालयात महानगरपालिकेविरुद्ध किंवा तिच्या कोणत्याही प्राधिकरणांविरुद्ध, अधिकाऱ्यांविरुद्ध किंवा कर्मचाऱ्यांविरुद्ध कोणताही दावा किंवा कार्यवाही चालविण्यात येणार नाही किंवा चालू ठेवण्यात येणार नाही;

(क) कोणतेही न्यायालय किंवा अन्य प्राधिकरण अशा कोणत्याही जकात कराच्या परताव्याचा निदेश देणारा कोणताही हुकूमनामा किंवा आदेश काढणार नाही;

(ड) ज्याबाबतीत जकातीच्या रूपाने जमा झालेल्या किंवा वसूल करण्यात आलेल्या कोणत्याही रकमेचा या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी परतावा करण्यात आला असेल आणि ज्या दिनांकाला अशा परताव्याचा आदेश देण्यात आला किंवा त्या रकमेचा अशा प्रकारे परतावा करण्यात आला त्या दिनांकाला, या अधिनियमाच्या तरतुदी व कलम २ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले नियम हे अंमलात असते तर, ज्याबाबतीत अशा परताव्याची मुभा देण्यात आली नसती त्याबाबतीत अशा प्रकारे परतावा करण्यात आलेली रक्कम मुख्य अधिनियमाच्या तरतुदींनुसार वसूल करता येईल ;

(ई) या अधिनियमाच्या किंवा कलम २ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदी अंमलात असत्या तर, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी कोणत्याही वेळी, जकात लादणे, तिची आकारणी करणे, फेरआकारणी करणे, ती गोळा करणे किंवा वसूल करणे यांकरिता जी कोणतीही कार्यवाही, कृती किंवा गोष्ट वैधरीत्या करता आली असती किंवा चालू ठेवता आली असती परंतु जी जकात लादण्यात आली नाही, तिची आकारणी, फेरआकारणी करण्यात आली नाही, जी गोळा करण्यात आली नाही किंवा वसूल करण्यात आली नाही ती जकात, अशा प्रारंभानंतर, या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींअन्वये लादता येईल, तिची आकारणी, फेरआकारणी करता येईल, ती गोळा करता येईल, वसूल करता येईल किंवा अशी कृती, कार्यवाही किंवा गोष्ट करता येईल.

(२) शंकानिरसनार्थ याद्वारे असे घोषित करण्यात येते की, पोट-कलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे एखाद्या व्यक्तीस,—

(अ) जकात कर लादणे, त्याची आकारणी करणे, फेरआकारणी करणे, तो गोळा करणे किंवा त्याची वसुली करणे यांच्या संबंधात मुख्य अधिनियमाच्या तरतुदींनुसार आक्षेप घेता येण्यास प्रतिबंध होतो असे मानण्यात येणार नाही, किंवा

(ब) मुख्य अधिनियमाच्या तरतुदींनुसार, त्या अधिनियमाअन्वये त्याच्याकडून जकात म्हणून देय असलेल्या रकमेपेक्षा जास्त असलेल्या जकातीचा मुख्य अधिनियमाअन्वये किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांअन्वये परतावा मागता येण्यास प्रतिबंध होतो असे मानण्यात येणार नाही.

(३) या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे कोणतीही व्यक्ती, तिने या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या संबंधातील कोणत्याही अपराधासाठी, अशी कृती किंवा अकृती ही, या अधिनियमाद्वारे तरतुदी करण्यात आल्या नसत्या तर, मुख्य अधिनियमान्वये अपराध ठरत नसेल तर, सिद्धदोष ठरवली जाण्यास पात्र ठरणार नाही अथवा कोणतीही व्यक्ती ही, या अधिनियमास प्रारंभ होण्याच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या कायद्यान्वये, अशा कृतीच्या किंवा अकृतीच्या संबंधातील अपराधाकरिता तिला जी शिक्षा देण्यात आली असती त्यापेक्षा अधिक शिक्षा दिली जाण्यास, पात्र ठरणार नाही.

सन १९९१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ याचे निरसन व व्यावृत्ती.

४. (१) नागपूर शहर महानगरपालिका (भूतलक्षी प्रभावाने जकात नियम पुनरधिनियमित करणे व विधिग्राह्यकारी तरतुदी) अध्यादेश, १९९१, हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९९१ चा महा. अध्या. ४.

(२) असे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअन्वये केली असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

प. ग. पाटील,

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.